IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766
AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

SRJIS

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2021, VOL- 10, ISSUE-47

## Special Issue of Mahatma Jyotiba Phule, Mahavidyalay, Mukhed



**Editor In Chief**

**Dr. Adkine Shivanand Baliram,**

Principal

Scanned with CamScanner

# INDEX



| Sr. No. | Title & Author (S) Name | Page. No. |
|---|---|---|
| 1 | म. बस्वेश्वरांचा लिंगायत धर्म आणि अनुयायांची वास्तव स्थिती<br>*प्रा. डॉ. शंकर गड्डमवार* | 1-4 |
| 2 | जातवर्गस्त्रीदास्यांतक चळवळीचे आद्य प्रवर्तक महात्मा बसवण्णा<br>*डॉ. मारोती द. कसाव* | 5-9 |
| 3 | महात्मा बसवेश्वर : समतेचा महामेरू कालातीत विचारधारा<br>*डॉ. एस. सी. आडवितोट* | 10-11 |
| 4 | जाती निर्मुलनाचा प्रणेता: महात्मा बसवेश्वर<br>*डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे* | 12-15 |
| 5 | समतेचे उपासक : महात्मा बस्वेश्वर<br>*प्रा. डॉ. तोळमारे शशिकांत शिवापा* | 16-20 |
| 6 | जातीयतेची शृंखला तोडणारे समाज सुधारक : महात्मा बसवेश्वर<br>*प्राचार्य डॉ. राम जाधव* | 21-24 |
| 7 | अनुभव मंटप : महात्मा बसवेश्वरांचे अद्वितीय कार्य<br>*प्राचार्य डॉ. सदानंद हरिबा गोणे & प्रा. डॉ. पद्माकर बालाजी गोणे* | 25-27 |
| 8 | महात्मा बसवेश्वरांची सामाजिक चळवळ<br>*प्रा. डॉ. विश्वनाथ गोविंदराव कंधारे* | 28-29 |
| 9 | महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक योगदान : एक दृष्टिक्षेप<br>*प्रा. डॉ. श्यामसुंदर पंढरीनाथ वाघमारे* | 30-33 |
| 10 | महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची प्रासंगिक गरज<br>*प्रा. डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे* | 34-41 |
| 11 | परिवर्तनवादी युगपुरुषः महात्मा बसवेश्वर<br>*प्रा. डॉ. शंकर लेखणे* | *42-43* |
| 12 | युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर<br>*डॉ. माधव बसवंते* | *44-48* |
| 13 | मध्ययुगीन भारतातील विद्रोही समाजसुधारक : महात्मा बसवेश्वर<br>*प्रा. सचिन अशोक धेंडे* | *49-51* |



Scanned with CamScanner

## परिवर्तनवादी युगपुरुषः महात्मा बसवेश्वर

**प्रा.डॉ.शंकर लेखणे**
*लोकप्रशासन विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर ता. बिलोली जि. नांदेड*

**प्रास्ताविक:-** भारतातील धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनामध्ये परिवर्तनवादी विचारांची एक फार मोठी व समृद्ध अशी परंपरा राहिली आहे. या परंपरेतील एक परिवर्तनवादी युगपुरुष म्हणजे महात्मा बसवेश्वर होय. १२ व्या शतकांमध्ये आपल्या विचारातून व आचारातून त्यांनी समाजामध्ये समतेची बिजे रोवली, आणि समाजामध्ये मानवतावादाची ज्योत प्रज्वलित केली तत्कालीन धार्मिक व जाती-पातीच्या भेदभावातून व शोषणातून माणसाला बाहेर काढून समतेच्या तत्वज्ञानावर आधारित अशा लिंगायत धर्माची स्थापना केली. महात्मा बसवेश्वरांच्या जन्म तारखेबद्दल मतभिन्नता असली तरी त्यांचा जन्म अक्षय तृतीयेला झाल्याचे मानले जाते,म्हणून त्यांची सार्वजनिक जयंती याच दिवशी साजरी केली जाते. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म ११०५ साली कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यात बागेवाडी येथे झाला. महात्मा बसवेश्वर हे समतावादी होते,त्यामुळेच समाजामध्ये ज्या ज्या ठिकाणी त्यांना भेदभाव व विषमता दिसली त्यावर त्यांनी टीका केली, एवढ्यावरच ते थांबले नाही तर त्या विषमतेविरुद्ध लढून समताधिष्ठित समाज निर्माण केला. 'शिवानुभव मंटप', 'कायक वे कैलास','दासोह','श्रमप्रतिष्ठा','आंतरजातीय विवाह', या सारख्या सिद्धांताची व विचारांची मांडणी करून आणि त्यानुसार प्रत्यक्ष कार्य करून परिवर्तनवादी विचारांचा मार्ग प्रशस्त केला.

* शिवानुभव मंटप:- बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी आजच्या लोकशाही व्यवस्थेसारखी सर्वांना अभिव्यक्तींचे, विचारांचे स्वातंत्र्य देणाऱ्या शिवानुभव मंटपची कल्याण येथे स्थापना केली. या विचारपीठात सर्वांना सहभागी होण्याची समान संधी होती, कोणत्याही जातीधर्मातील स्त्री-पुरुष यात सहभागी होऊ शकत होते. त्या काळात लिंगभेद, जातीभेद व वर्णभेद टोकाचा होता. समाजात मानसे या भेदाभेदामुळे एकमेकांच्या जवळ येत नव्हते. त्याकाळात सर्वांना एकाच मंटपात एकत्र आणण्याचे क्रांतिकारक कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले. या शिवानुभव मंटपात सहभागी होणाऱ्या पुरुषांना शिवशरण व स्त्रियांना शिवशरणी असे संबोधण्यात येत असे. या ठिकाणी वेगवेगळ्या सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक विषयावर चर्चा होत असत. लोकांच्या मनातील प्रश्नोत्तरे संवाद स्वरुपात मांडली जात असत तसेच विचारांची देवाण-घेवाण होत असे, त्यामुळे त्याकाळात समाजप्रबोधनाच्या कार्याला गती मिळाली.

**कायक वे कैलास:-** महात्मा बसवेश्वरांनी लोकांच्या केवळ धार्मिक आध्यात्मिक उन्नतीकडे लक्ष दिले नाही तर त्यांच्या आर्थिक समृद्धीकडे, व्यावसायिक स्वातंत्र्याकडे आणि व्यावहारिक शुद्ध्तेकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले होते. लोकांना श्रमाची महती कळावी,श्रमाला प्रतिष्ठा यावी, यासाठी त्यांनी 'कायक वे कैलास' हा सिद्धांत मांडून लोकांना उपदेशित केले की, ' तुम्ही जे काम मनापासून करता तीच भगवान शिवाची पूजा आहे, उपासना आहे'. कर्म हीच पूजा आहे हा संदेश देऊन त्यांनी श्रम प्रतिष्ठेला महत्त्वाचे स्थान दिले. त्यामुळे कोणतेही काम कनिष्ठ नसते प्रत्येकाने आपल्या कामाकडे कर्तव्याकडे शुद्ध दृष्टीने पाहिले पाहिजे असा उपदेश करून समाजातील लोकांना कर्मप्रवृत्त केले. त्याचबरोबर काम करून तुम्ही जी संपत्ती मिळवता त्याचा वापरही शुद्धतेने झाला पाहिजे. संपत्तीचा संचय करण्याऐवजी तिचा उपयोग समाजासाठी झाला पाहिजे. असा ते संदेश देत असत यासाठी त्यांनी 'दासोह' हा सिद्धांत मांडलेला दिसून येतो.

**आंतरजातीय विवाह:-** आधुनिकतेकडे प्रचंड वेगाने जाणाऱ्या भारतीय समाजव्यवस्थेत आजही आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहाला लोकांची सर्वसंमती असलेली दिसून येत नाही. अशा प्रकारच्या विवाहांना कायदेशीर मान्यता असली तरी कुटुंब व समाज मान्यता देईलच असे नाही, अशा विवाहांना कुटुंबाकडून व जात बांधवांकडून मोठ्या



Scanned with CamScanner

प्रमाणात विरोध होत असल्याची असंख्य उदाहरणे आपल्या सभोवताली दिसून येतात. परंतु आंतरजातीय विवाह बाराव्या शतकात घडवून आणण्याचे क्रांतिकारक कार्य महात्मा बसवेश्वरांनी केलेले दिसून येते. मानवनिर्मित जातीपातीच्या भिंतींना त्यांनी त्या काळात सुरुंग लावल्याचे दिसून येते. मागास जातीतील संत हरळय्या आणि उच्चभ्रू जातीतील कलावती यांचा विवाह घडवून आणला आणि आपल्या समताधिष्ठित क्रांतिकारी समाजकार्याला महात्मा बसवेश्वरांनी गतिमान केले.

**महिला सबलीकरण:-** महिलांना समाजात हक्क देऊन त्यांना सशक्त करण्यासाठी आजही शासनाला अनेक कायदे करावे लागत आहेत, महिला सबलीकरणासाठी अनेक कार्यक्रम राबवून प्रयत्न करावे लागत आहेत. तरीही पुरुषप्रधान संस्कृती कोणत्या ना कोणत्या प्रकारे स्त्रियांवर बंधने घालण्याचा प्रयत्न करत असते. एकंदरीत लिंगभेदाची मानसिकता काही प्रमाणात का असेना आजही समाजामध्ये दिसून येते व स्त्रियांना आपल्या हक्कासाठी आजही लढावे लागते. यावरून बाराव्या शतकात महिलांवर किती बंधने असतील याचा आपल्याला अंदाज येऊ शकतो. तत्कालीन समाजाने स्त्रियांना धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक बंधनात जखडून ठेवले होते. त्यामुळे स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत निम्न समजले जात असे, अशा परिस्थितीत महात्मा बसवेश्वरांनी क्रांतिकारक पावले उचलून स्त्रियांना अनेक निर्बंधातून मुक्त केले. स्त्रियांना धार्मिक व अध्यात्मिक अधिकार मिळवून दिले, अनुभव मंटपात स्त्रियांना सहभागी करून घेतले, त्यांना मत मांडण्याचा, अभिव्यक्तीचा हक्क दिला त्याचबरोबर स्त्रियांच्या बाबतीत असलेल्या अशुद्धतेच्या व पंचसुतकाच्या कल्पनेतून मुक्त केले.

**कर्मकांडातून समाजाची मुक्तता:-** महात्मा बसवेश्वरांनी लिंगायत धर्माची स्थापना करून कर्मकांडात अडकलेल्या लोकांची कर्मकांडातून मुक्तता केली. होमहवन,मूर्तिपूजा या कर्मकांडाची आवश्यकता नसल्याचा विचार त्यांनी मांडला. देवाची पुजा करण्यासाठी मंदिरात जाण्याची आवश्यकता नाही तर आपल्या देहाला देवालय माना, अशा विचारांची रुजूवात केली. आपल्या अनेक वचनांनी लोकांना आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत, समृद्ध करण्याचा महात्मा बसवेश्वर यांनी प्रयत्न केला. लोकांना अंधश्रद्धेतून मुक्त करून त्यांचे आचरण शुद्ध व्हावे यासाठी आपल्या वचनातून प्रबोधन केले, सर्व माणसे एक आहेत असा समतेचा विचार मांडला. लोकांना विवेकवादी मार्ग दाखविला, खऱ्या ज्ञानाचे मंगलमय प्रकाश दर्शन घडविले आणि नवसमाज निर्माण केला. महात्मा बसवेश्वर यांचे बाराव्या शतकातील हे क्रांतिकारी कार्य पाहिल्यानंतर ते क्रांतिकारक युगपुरुष होते व त्यांनी परिवर्तनवादी समाज निर्मितीचा मार्ग आपल्या कार्याने तेजांकित केल्याचे दिसून येते.

**संदर्भ:-**

*डॉ. सचितानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरू महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन, पूर्णा- 2015*
*डॉ. शरदचंद्र देगलूरकर, संत साहित्याचा सामाजिक अन्वयार्थ, देगलूर-2004.*
*प्राचार्य शिवाजीराव भोसले, हितगोष्टी, अक्षरब्रह्म प्रकाशन, पुणे- 2004*
*https://mr.m.wikipedia.org*
*https://www.santsahitya.in*
*https://www.inmarathi.com*



Scanned with CamScanner